महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्र.- ४७ दिनांक ०४/०३/२०२१

## घरफोडी, जबरी चोरी करणा-या सराईत आरोपीस पकडूण २,८०,५००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन ६ गुन्हे उघडकीस आणण्यास तुळींज पोलीसांना यश

दि. २५/२/२०२१ रोजी फिर्यादी वय ३७ वर्षे, रा. संतोष भुवन वळईपाडा नालासोपारा पुर्व हे पांडेनगर, वलईपाडा, सतोषभुवन नालासोपारा पुर्व येथुन पायी चालत जात असताना कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी पल्सर मोटार सायकलवरुन पाठीमागुन येवुन त्यांचे हातातील मोबाईल हिसकावुन चोरुन नेला सदर बाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि क्र. २७८/२०२१ भा.दं.वि.स कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास तुळिंज पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/संदेश पालांडे, पोउपनि/ज्ञानेश्वर कोकाटे यांना सदर गुन्हयाचा कौशल्यपुर्ण तपास करून आरोपी सोनु ओमप्रकाश जयस्वाल, वय २२ वर्ष यास अटक करुन तपास केला असता आरोपींनी तुळींज पोलीस ठाणे हद्दीत एकुण ०६ जबरी चोरी, घरफोडीचे गुन्हे केल्याचे उघड होवुन आरोपीताकडुन चोरीचे एकुण २७ मोबाईल, २ लॅपटॉप, १ एल.सी.डी.टी.व्ही. व चोरी करण्याकरीता वापरलेली पल्सर मोटार सायकल असा एकुण २,८०,५००/- रु किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला असुन अधिक तपास सुरु आहे. आरोपी कडूण खालील प्रमाणे तुळींज पोलीस ठाणे येथील गुन्हे उघड झाले आहे.

सदरची कामगीरी श्री. श्रीकांत वाघुंडे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, वपोनि/राजेंद्र कांबळे, तुळिंज पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/संदेश पालांडे, पोउपनि/ज्ञानेश्वर कोकाटे, स.फौ/बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, पोहवा/अनिल शिंदे, पोना/आनंद मोरे, राकेश शिरसाट, प्रशांत सावदेकर, शेखर पवार, पोशि/योगेश नागरे, अशपाक जमादार, ईस्माईल छपरीबंद, शशि पोटे, विनायक राउत, सुखराम गडाख यांनी केली आहे.

| अ.क्र. | तुळींज पो.स्टे. गु.र.न. व कलम | अ.क्र. | तुळींज पो.स्टे. गु.र.न. व कलम |
|---|---|---|---|
| १ | २९२/२०२० भादविस कलम ३९२,३४ | ४ | १९२/२०२१ भादविस कलम ३९२ |
| २ | ११०/२०२१ भादविस कलम ४५७,३८० | ५ | २७८/२१ भादविस कलम ३९२,३४ |
| ३ | १६१/२०२१ भादविस कलम ३९२ | ६ | ३०३/२१ भादविस कलम ४५४,३८० |

-------ooooo-------